## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात योग पंडीत इंजि. एकनाथ बावने यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्र साधना कार्यक्रम घेण्यात आला.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि योगशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने योगशास्त्रात असलेले गुरूपोर्णिमेचे महत्व विचारात घेवून मंत्र साधना हा कार्यक्रम ३०० विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. यावेळी रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, श्रीमती लता बावने, योगशास्त्र विभागप्रमुख इंजि.राजेश पाटील उपस्थित होते. याप्रसंगी एकनाथ बावने यांनी सांगितले की, मंत्रांचे संस्कार नकारात्मकता घालवतात. हठ योग, राज योग, कुंडलिनी योग, क्रिया योग इ. योग उच्च ध्येय प्राप्त करून देतात. जीवनात सेवा – प्रेम – दान हे तीनही गुण महत्वाचे असून हे आपल्याला मंत्रसाधनेमुळे प्राप्त होतात. असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात मंत्र साधना करवून घेतली. प्रा. नांद्रे यांनी सांगितले की, जीवनात गुरूंचे महत्व असून प्रत्येक मार्गावर गुरू आपल्याला मार्गदाखविण्याचे काम करीत असतात. प्रास्ताविक करतांना इंजि. राजेश पाटील यांनी सांगितले की, मंत्रसाधना ही केवळ अक्षरांची जुळवाजुळव नसून वर्णांच्या उच्चारणाद्वारे निर्माण होणाऱ्या स्पंदनातून सामर्थ्य उत्पन्न करण्याची प्रक्रिया होय.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.लिना चौधरी यांनी केले तर आभार प्रा.गितांजली भंगाळे यांनी मानले. यावेळी प्रा.लिंता चौधरी, वाल्मिक पाटील, यशवंत गरूड, सुरेश बागुल,हिंमत जाधव इ. कर्मचारी उपस्थित होते.

**बातमी नं २**

जळगाव दि. २१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व केंद्रीय विद्यालया अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या इयत्ता आठवी ते बारावीतील २५० पेक्षा अधिक विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शुक्रवारी दि. २५ जुलै २०२५ रोजी करियर समुपदेशन व व्यावसायिक कौशल्य या विषयावर सकाळी १० वाजता कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या अधीसभागृहात करण्यात आले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेला उपस्थित राहावे असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. डॉ. आशुतोष पाटील यांनी केले आहे.

.....................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २१ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता